# संस्थापकांचे मनोगत

आपल्या संस्थेचे संकेतस्थळ तयार केल्यामुळे संगणकाच्या माध्यमातून माहीतीचे आदान प्रदान करणे सभासदांना सहज शक्य होणार आहे.

संस्थेचे संकेतस्थळ असले पाहिजे ही कल्पना एखाद्या सभासदाच्या मनात निर्माण होणे आणि ती त्याने प्रत्यक्षात आणणे ही बाब खरोखरच कौतुकास्पद आहे.

संस्थेचे संकेतस्थळ तयार करून घेतले असते तर त्यासाठी खूप मोठा खर्च आला असता. संस्थेचे सभासद श्री विक्रम जाधव यांनी संस्थेचे संकेत स्थळ असावे अशी सूचना संस्थेच्या आमसभेत मांडली होती. ते स्वतः संकेतस्थळ बनविण्यात तज्ञ असल्यामुळे त्यांनी स्वतः संस्थेचे संकेतस्थळ बनविण्याचे आश्वासन दिले होते. संकेतस्थळासाठी लागणारी शासकीय फी जी खूपच अल्प आहे तेव्हढीच फक्त संस्थेने भरली आहे.

श्री विक्रम जाधव यांनी आपला बहुमोल वेळ खर्च करून, त्रास घेऊन तळमळीने संस्थेचे संकेतस्थळ स्वतः विकसीत केले आहे. यातून त्यांची संस्थेबद्दल असणारी आत्मीयता, आपुलकी आणि प्रेमच व्यक्त होते आहे. संस्थेचे असे चाणाक्ष, हुशार आणि हरहुन्नरी सभासद संस्थेत असणे संस्थेसाठी नक्कीच भूषणावह आहे.

श्री विक्रम जाधव यांच्या या महान कार्याबद्दल त्यांचे व्यक्तीशः आणि संस्थेच्या वतीने मनापासून आभार.

धन्यवाद !

संस्थापक

शब्बीर शेख, स्वीय सहाय्यक,
जिल्हा न्यायालय, सातारा.